## जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


**प्रेसनोट क्र. ३०८२, दि. २४ /०९ /२०१९**

**मार्केटयार्ड पोलीस स्टेशन, पुणे शहर**

# कुरीयर कंपनीत काम करणा-या तरुण मुलांनी त्यांना रस्त्यावर पडलेले मोबाईल प्रामाणिकपणे पोलीसांच्या ताब्यात दिले बाबत.

---

आज दि.२४/०९/२०१९ रोजी मार्केटयार्ड पोलीस स्टेशन हद्दीत कॉलेजमधुन घरी जाणा-या गंगाधाम परिसरात राहणा-या मुलीचा सिटीप्राईड याठिकाणी मोबाईल हरविला.मुलगी नामे कुमारी साक्षी मुंडा रा.गंगाधाम मार्केटयार्ड पुणे ही मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे १८/०० वा.चे सुमारास आली.ठाणे अंमलदार मदतनीस सहाय्यक पोलीस उप निरीक्षक श्री एस.एस.मुचंडे यांनी तात्काळ हरविलेल्या मोबाईल नंबरवर फोन केला असता अमित राजेंद्र कांबळे वय २४ रा.भवानीपेठ भवानीमाता मंदिरचे बाजुस पुणे व त्याचा मित्र किशोर वसंतराव खरात वय २६ रा.काशीवाडी पुणे ह्यांनी फोन उचलला.फोन उचलल्यानंतर सहाय्यक पोलीस उप निरीक्षक श्री एस.एस.मुचंडे यांनी सदरचा फोन हरविला आहे तुम्ही हा फोन तात्काळ मार्केटयार्ड पोलीस स्टेशनला आणुन द्या आपणाविरुद्ध कोणताही कायदेशीर कारवाई होणार नाही याची खात्री दिली.त्यावरुन आम्ही कुरियर कंपनीत कामे करतो आम्ही पार्सल देण्यासाठी आलो आहोत.पार्सल दिल्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन येथे येतो असे सांगितले.सदरचा झालेला प्रकार श्री एस.एस.मुचंडे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री निंबाळकर यांना सांगितला त्यावरुन त्यांनी सदरची मुले ही प्रामाणिक असल्याने आपण त्यांचे पोलीस स्टेशन येथे सत्कार करु असे सांगितले.त्यावरुन फुलाचा गुलदस्ता देवुन मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी प्रामाणिक तरुण मुलांचा सत्कार केला.


POLICE STATION VISIT
ADD. C.P. EAST REGION
DCP ZONE - 5
ACP. WANWADI
महाराष्ट्र पोलीस